श्री. संजय पांडूरंग हाडके, समन्वय अधिकारी, मंत्रालय नियंत्रण कक्ष यांना मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन)
शासन निर्णय क्रमांक :- आव्यप्र २०१६/प्र.क्र. १५३/आव्यप्र-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक. २७ सप्टेंबर, २०१७

<u>वाचा</u> : १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण २७१५ /प्र.क्र.१०० / १३, दि.०८.०१.२०१६.
२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- आव्यप्र २०१६ / प्र.क्र.१५३ /आव्यप्र-१, दि.०१.१०.२०१६ (पॅनल नियुक्ती)
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- आव्यप्र २०१६ / प्र.क्र.१५३ /आव्यप्र-१, दि.०१.१०.२०१६ (श्री. हाडके यांची नियुक्ती)

<u>प्रस्तावना</u> : -

मंत्रालय नियंत्रण कक्षात समन्वय अधिकारी हे पद सामान्य प्रशासन विभागाच्या संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दि.०८.०१.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनूसार करार पध्दतीने भरण्यात यावे असे नमूद असल्याने महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) विभागाच्या संदर्भ क्रमांक ३ वरील शासन निर्णय क्र.आव्यप्र २०१६/प्र.क्र.१५३/आव्यप्र-१, दि.०१.१०.२०१६ अन्वये विहीत केलेल्या तरतूदीनूसार श्री. संजय पांडूरंग हाडके, समन्वय अधिकारी, मंत्रालय नियंत्रण कक्ष यांची एक वर्षाच्या कालावधीसाठी दि.०१.१०.२०१६ पासून नियुक्ती करण्यात आली होती. सदर नियुक्ती दि.३०.९.२०१७ ला संपुष्टात येत असून त्यास १ वर्षाची मुदतवाढ देण्याची विनंती श्री. हाडके यांनी केली आहे. तद्‌नूसार, श्री. संजय पांडूरंग हाडके यांच्या समन्वय अधिकारी, मंत्रालय नियंत्रण कक्ष या पदावरील नियुक्तीस मुदतवाढ देण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मंत्रालय नियंत्रण कक्षातील दैनंदिन कामकाजासाठी समन्वय अधिकाऱ्याची आवश्यकता असल्याने सदर पदावर कायमस्वरुपी नियुक्ती आवश्यक आहे. श्री. सजंय पाडूरंग हाडके यांचे नाव पॅनल लिस्टमध्ये असुन सदर लिस्टला ३ वर्षाची मान्यता देण्यात आलेली आहे. दरम्यान सामान्य प्रशासन विभागाने सेवा करार पध्दतीने नेमावयाच्या अधिकाऱ्याच्या पदाबाबत असलेले शासन निर्णय दि.०८.०१.२०१६ आणि दि.०२.०३.२०१६ हे अधिक्रमित करुन दि.१७.१२.२०१६ रोजी नवीन शासन निर्णय निर्गमित केला असुन सदर शासन निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने मुळ शासन निर्णयाच्या निर्गमनाच्या दिनांकापासून लागू केला आहे. श्री. हाडके सदर शासन निर्णयातील अटी शर्ती नुसार मंजूर मुदतवाढीसाठी पात्र आहेत. सबब श्री. हाडके, समन्वय अधिकारी यांना दि.३०.०९.२०१७ च्या पुढे दि.०१.१०.२०१७ ते दि.३१.१२.२०१७ या ३ महिन्यांच्या कालावधीसाठी शासन निर्णय दि. १७.१२.२०१६ मधील तरतूदीनुसार खालील अटींच्या अधिन मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

1. **सन २०१६-१७ चा मंत्रालय नियंत्रण कक्षाचा वार्षिक अहवाल तयार करणे व विधानमंडळास सादर करणे.**

२. श्री. हाडके यांच्या कार्यालयीन कामाची वेळ नियमित शासकीय कार्यालयीन कामाच्या वेळेप्रमाणेच म्हणजे सकाळी ९.४५वा. ते सांयकाळी ५.३० वा राहील. मात्र, आपत्कालीन परिस्थितीत त्यांनी सर्वकाळ उपलब्ध असणे आवश्यक आहे.

३. मंत्रालय नियंत्रण कक्षाशी अनुषंगिक कामकाज करणे.

तथापि, सदर अटींची समाधानकारक पुर्तता श्री. हाडके यांचेकडून झाल्यानंतर त्यांना पुढील कालावधीसाठी नियुक्ती चालु ठेवण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल

४. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ च्या शासन निर्णयामध्ये समाविष्ट केलेल्या अटी शर्ती त्यांच्या नियुक्तीसाठी लागू राहतील. तसेच त्यांना देय असलेले मासिक पारिश्रमीक या शासन निर्णयात नमूद केलेल्या तरतूदीनूसार निश्चित करण्यात यावे व त्यांचा मागील कालावधीत काही मासिक पारिश्रमीक मध्ये फरक निघत असल्यास देण्यात यावे. या शासन निर्णयानूसार कंत्राटी अधिकाऱ्याचे सेवा (ग्रेड वेतन रु. ७६००/- पेक्षा कमी या संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या शासकीय अधिकाऱ्यांच्या बाबतीत) मंजूर करण्याचे अधिकारी विभाग प्रमुखास प्रदान करण्यात आले आहेत.

५. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. सीबीई-१८९३/प्र.क्र.३८/९३/तेरा, दि. १५.०२.१९९५ मधील परिच्छेद क्रमांक ७ नुसार शासकीय निवासस्थानाची अनुज्ञप्ती शुल्क भरण्याची जबाबदारी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडून वसूल येते. श्री. हाडके यांच्याबाबत महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- आव्यप्र २०१६ / प्र.क्र.१५३ / आव्यप्र-१, दि.०१.१०.२०१६ या शासन निर्णयात शासकीय निवासस्थानाचा उल्लेख नसल्याने सदर शासन निर्णयानुसार त्यांचे अनुज्ञप्ती शुल्क वसूल झालेले नाही. सदर शासन निर्णयातील तरतूदीपैकी क्र. ७ येथील तरतूदीनूसार श्री. हाडके यांच्या प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून नियमानूसार असलेले अनुज्ञप्ती शुल्क त्यांच्या मासिक पारिश्रमीक (वेतन) मधून वसुल करुन संबंधित यंत्रणेकडे जमा करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

६. प्रस्तुत नियुक्तीला महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- आव्यप्र २०१६ / प्र.क्र.१५३ / आव्यप्र-१, दि.०१.१०.२०१६ या मध्ये नमूद केलेल्या सर्व अटी लागू राहतील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharshtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१७०९२७१५१६११८६१९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नावाने,

Hemant Sudhakar Dange

Digitally signed by Hemant Sudhakar Dange
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2fbeecf30dbdfaa940e8f2828e95f9d4887d464ef7d572a989b5f7bced6665be, cn=Hemant Sudhakar Dange
Date: 2017.10.03 16:38:45 +05'30'

(हेमंत डांगे)

शासनाचे अवर सचिव, महसूल व वन विभाग

प्रति,

१. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
२. सर्व विभागीय आयुक्त

३. सर्व जिल्हाधिकारी,
४. सर्व महानगरपालिका आयुक्त
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२ मुंबई / नागपूर.
६. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२ मुंबई / नागपूर.
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
९. सर्व मंत्रालयीन विभाग.
१०. श्री. संजय पांडूरंग हाडके, समन्वय अधिकारी, मंत्रालय, नियंत्रण कक्ष,
११. निवड नस्ती.